*(.pdf copy)*

**नियमित दिवाणी दावा क्र. ५७/२०२०**

CNR No. MHSO060005692020

शामल रणदिवे

वि.

राजाराम भोसले वगैरे

## आदेश निशाणी क्र. ७० आणि १ वर

दावा मिळकत संपादीत क्षेत्राचा मोबदला रक्कम रु. ८५,७६,७३०/- पैकी रक्कम रु. ६३,३३,५७०/- ही दावा दाखल करण्यापुर्वी प्रतिवादी क्र. ६ यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना दिली होती. प्रस्तुत दावा दाखल केल्यामुळे वादी यांच्या हिश्याची रक्कम रु. २१,४४,१८२ आणि ५० पैसे प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांचेकडेच ठेवली होती. नंतर हा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ६ उपविभागीय अधिकारी श्री. गजानन गुरव यांनी दावा मिळकत गट नं. ४६९ व ४७० मधील संपादीत क्षेत्राची वादी यांची ठेवलेली रक्कम प्रतिवादी क्र. १ व २ यांना बेकायदेशीरपणे अदा केली आहे. त्याबाबतचा मजकूर दावा कलम ६(अ) आणि ११(अ)(२) आणि ११(अ)(३) प्रमाणे समाविष्ट करण्याची परवानगी मिळावी यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. २ यांनी निशाणी क्र. ७३ प्रमाणे त्यावर सविस्तर म्हणणे देऊन त्यांचा आक्षेप नोंदवला आहे. प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केली तर दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होईल. वादी यांना रक्कम रु. २१,४४,१८२ आणि ५० पैसे ही कायद्याने मागता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०३. हा दावा सरस निरस मनाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणे व निरंतर मनाई हुकूम वगैरेसाठी दाखल करण्यात आला आहे. दावा मिळकतपैकी काही क्षेत्र संपादन झाले आहे. संपादीत क्षेत्राच्या मोबदला रकमेमध्ये वादी यांचा हिस्सा आहे. ती रक्कम प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी वादी यांना द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

०४. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ६ यांनी वादी यांच्या तथाकथीत हिश्याची रक्कम रु. २१,४४,१८२ आणि ५० पैसे ही प्रतिवादी क्र. १ व २ यांना अदा केली आहे. त्यामुळे त्याबाबतचा मजकूर व विनंती या दाव्यात समाविष्ट करण्याची वादी यांना परवानगी दिली तर वादविषयाचा गुणदोषावर योग्य व अंतिम निर्णय होण्यास मदत होईल. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जामध्ये नमूद प्रस्तावित दुरुस्ती दावा निशाणी क्र. १ मध्ये करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.11.24 12:24:02 +0530

दि. २३/११/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

*(.pdf copy)*

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 23/11/2022 |
| Order uploaded on | : | 24/11/2022 |